सामना

# कलेचा अनोखा अंदाज



***कला*** ही अमर्याद असते, तिला कधीही शेवट नसतो. ज्या व्यक्तीकडे कला आहे ती व्यक्ती आयुष्यात कधीच एकटी पडत नाही. अशाच अनेक कला अवगत असलेल्या एक भन्नाट कलाकार म्हणजे अनिता कुलकर्णी. मूळच्या मुंबईकर असलेल्या अनिता या सध्या अमेरिकेत स्थायिक आहेत. परदेशात राहूनही मायभूमीशी त्यांची नाळ जोडली गेली आहे. अनिता या शास्त्रीय गायिका आणि शास्त्रीय नृत्यांगना आहेत. हिंदुस्थानी कला आणि संस्कृतीचा प्रसार व्हावा यासाठी त्या आपल्या रेणू फोरम फॉर द आर्टस् या संस्थेमार्फत अमेरिकेसह हिंदुस्थानात ओडिसी नृत्याचे सादरीकरण करतात. साधारण डिसेंबर ते मार्च या कालावधीत त्यांचे हिंदुस्थानात कार्यक्रम असतात. २१ जानेवारीला पुण्यातील कार्यक्रमाला मिळालेल्या तुफान प्रतिसादानंतर उद्या, ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहातील मिनी थिएटरमध्ये त्यांचा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना, कथा, संगीत आणि कलादिग्दर्शनाची धुरा अनिता यांनीच सांभाळली आहे. तर नृत्यदिग्दर्शन दक्षा मश्रुवाला यांचे आहे.

**मानसी पिंगळे**
म. ल. डहाणूकर कॉलेज